सन २०१८-१९ करीता इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) योजनेंतर्गत Eco Tourism Complex at Allapalli या निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामांकरिता निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.निसप-२०१९/प्र.क्र.१२१/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २८ मार्च, २०१९

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/२०१९/कोषा प्रशा-५, दि. ३१.०१.२०१९
४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८ मार्च, २०१९
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष १/पी/यो/चाबाप्र/ भाग-३/ प्र.क्र.४२/२२०९/२०१८-१९, दि. ०१.०३.२०१९ रोजीचे पत्र.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-२/यो/ ETC ALL./३६६ /१८-१९, दिनांक १९.०६.२०१८ व क्र. ११०१, २८.०२.२०१९.
७. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांचे पत्र क्र.कक्ष-२(१)/योजना-ब/१८-१९/४०९, दिनांक १८.०६.२०१८ व क्र.१८३९, दिनांक २०.०२.२०१९

प्रस्तावना -:

सन २०१८-१९ करिता राज्य योजनेंतर्गत निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६- २२९५) या योजनेंतर्गत रुपये ७३९३.१५ लक्ष नियतव्यय आठमाही सुधारित अंदाज सन २०१८-१९ पत्रकानुसार मंजुर व अर्थसंकल्पित आहे. वित्त विभागाच्या दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१८-१९ करिता निधी वितरण /पुनर्विनियोजन प्रस्तावाच्या अनुषंगाने निधीचे वितरण करण्यात यावे, असे आदेश आहेत. सदर निधी वितरित करतांना दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिशिष्टातील अटीची पूर्तता व दिनांक २५.०१.२०१९ मधील सूचनांचे पालन करण्याचे कळविले आहे. सदर योजनेंतर्गत आतापर्यंत विविध शासन निर्णयान्वये रु.५८५४.५४४२ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. आता सदर योजने अंतर्गत रु.१५३८.६०५८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यासाठी शिल्लक आहे.

वित्त विभागाच्या दिनांक ३१.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये दिनांक ०१.०२.२०१९ नंतर कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देता येणार नाही अथवा प्रशासकीय मान्यता प्राप्त असेल तरीही निविदा प्रसिध्द करता येणार नाही. मात्र दिनांक ०१.०२.२०१९ पूर्वी निविदा प्रसिध्द झालेल्या प्रकरणात पुढील सर्व प्रक्रीया पूर्ण करता येतील असे विहित करण्यात आले आहे.

इको टुरिझम (राज्य) (२४०६२२९५) योजनेअंतर्गत Eco Tourism Complex at Allapalli या निसर्ग पर्यटन स्थळांचा आराखडा दिनांक २८.०७.२०१८ ला झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्या कार्यकारी समितीच्या सभेत सन २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षासाठी मंजूर झालेला असून, आराखडयाची एकूण किंमत रु.७७८.०५ लक्ष आहे. त्यापैकी सन २०१८-१९ साठी प्राप्त झालेल्या रु.२५१.४१ लक्षचा चालू बाब प्रस्ताव शिफारशीसह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी सादर केला आहे. आवश्यक कार्यबाबींना सक्षम अधिकाऱ्यांनी तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी दिल्याचे प्रपत्र “ब” मध्ये नमूद केले आहे. सदर प्रस्ताव संदर्भ क्र.५ च्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावास शासन मंजूरी प्रदान करुन BDS द्वारे अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुसार प्रस्तावातील कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णयः-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.५ अन्वये शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१,२,३ व ४ येथील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांचे नियंत्रणाखालील Eco Tourism Complex at Allapalli या निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामासाठी सन २०१८-१९ करीता सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये नमुद केलेल्या कामाकरिता रु.२५१.४१ लक्ष इतका निधी राज्य योजनेअंतर्गत इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षा अंतर्गत खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडयाप्रमाणे, विहित कार्ग्रपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना घ्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.
२. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
३. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.
४. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांनी निसर्ग पर्यटन स्थळातील सदर कामांच्या अंदाजपत्रकांची पडताळणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून करुन घ्यावी.
६. केंद्र शासन व राज्य शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाशी अनुकूल राहतील अशीच कामे कार्यान्वित करावी.
७. उपरोक्त कामे मंजूर अनुदानातून उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
८. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांची राहील.
९. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.
१०. सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही तसेच कामात कुठलीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.
११. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१२. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८,२५.०१.२०१९, ३१.०१.२०१९ व ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१३. शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१४. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१५. वितरित केलेला निधी मंडळे / महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयप्रपंची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधी मध्ये काढून ठेवता येणार नाही.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१५३७२३७११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.28 15:41:00 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
९. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

"परिशिष्ट - अ"

शासन निर्णय क्र.निसप-२०१९/प्र.क्र.१२१/फ-९, दिनांक २८ मार्च, २०१९ सोबतचे परिशिष्ट-अ

	सन 2018-19 Eco Tourism Complex at Allapalli निसर्ग पर्यटन स्थळ		
अ. क्र.	**बाब निहाय कामे**		**रक्कम रु.लाखात**
1	Construction of Traditional Mud House At Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		20.29
2	Construction of Dormitory (25 Beds) At Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		25.00
3	Construction of Canteen Building With Cafeteria At Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		24.59
4	Construction of Tribal Museum and Handicraft Centre At Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		23.47
5	Construction of Tree Hut At Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		21.69
6	Construction of Amphitheatre with Green Room At Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		24.99
7	Leveling & Drinage of Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		24.96
8	Repairs to Existing Road At Central Nursary Near Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		1.24
9	Construction of New Road At Central Nursary Near Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		2.48
10	Construction of Seed Processing Shed/Godown At CEntral Nursary Near Eco Tourism Complex Allapalli in Allapalli Range of Allapalli Forest Division		8.82
11	Providing Camping kits, emergency lights, sleeping Bag etc		5.00

12	Providing solar lighting, power backup, street light etc		8.00
13	Providing ticket Machine counter & computer Assassories etc		5.00
14	Preparation of Advertisement and publicity materials, etc		4.00
15	Providing & fixing of Signage, Display Board LED etc		6.00
16	Providing Mattereses,pillo other material for tiber museum etc		5.00
17	Providing Tables, Chairs, water RO kitchen utensiles etc		8.00
18	Providing indoor models,LED display board etc for interpretation center		13.00
19	Preparation of Teak Wood, Beds, Softa Sets, Dinning Tables & Other Furniture Assassories		6.00
20	Maintenance for 1 Year		2.88
21	Architect Consultation Charges, Estimate Preparation & Other Misc Expenditure		5.00
	Total :-		**251.41**

****